स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## अधीक्षक अभियंता,जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव

■ Email ID :sejipc1@gmail.com
■ दूरध्वनी:०२५७-२३५०३१,२२३५०३२

■गिरणा भवन,आकाशवाणी केंद्रासमोर,आकाशवाणी चौक, जळगांव

जा.क्र.जपाप्रमं/पशा/आ-१/ ५१७५ /२०२४

जाळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,जळगांव
दिनांक:- २४/१२/२०२४

प्रति,

अधीक्षक अभियंता,
ईप्रशासन मंडळ,
मुंबई.

विषय :- महामंडळांतर्गत विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये कायदे विषयक सल्ला देण्यास कायदे/विधी सल्लागाराची निकड लक्षात घेता अनुभवी निवृत्त न्यायाधीश यांची पुर्ण वेळ महामंडळाचा मुख्यालयी कायदे/विधी सल्लागार म्हणून नियुक्ती बाबत.

संदर्भ:- १.मा.कार्यकारी संचालक,तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांचे पत्र जाक्र/कांस/तापाविम/आ.२/५२५०/२०२२ दिनांक.२३/१२/२०२२
२. मा.कार्यकारी संचालक,तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांचे पत्र जाक्र/कांस/तापाविम/आ.२/५२५१/२०२४ दिनांक.१९/१२/२०२४

संदर्भानुसार महामंडळांतर्गत विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये कायदे विषयक सल्ला देण्यास कायदे/विधी सल्लागाराची निकड लक्षात घेता अनुभवी निवृत्त न्यायाधीश यांची पुर्ण वेळ महामंडळाचा मुख्यालयी कायदे/विधी सल्लागार म्हणून नियुक्ती बाबतची जाहिरात प्रसिद्ध करणेसाठी ईमेलने PDF व Scan स्वरुपात पाठविण्यात येत आहे.

कृपया सोबत पाठविण्यात येणारी जाहिरात शासनाचे संकेतस्थळावर दिनांक.२७/१२/२०२४ रोजी दुपारी-०१.०० वाजता शासनाचे संकेतस्थळावर (www.wrd.maharashtra.gov.in) यावर प्रसिद्ध करण्यात यावी ही विनंती.

**सोबत**- जाहिरात एकुण पृष्ठ क्र.१ ते ५

(य.का.भदाणे) 20/12/2024
**अधीक्षक अभियंता**
**जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ**
**जळगांव.**

**प्रत**-मा.कार्यकारी संचालक,,तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रत**-मा.मुख्य अभियंता,तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांना माहितीस्तव सविनय सादर.

Mahabharti.in

# सेवा करार पद्धतीने अनुभवी सेवानिवृत्त न्यायाधीश यांची कंत्राटी पध्दतीवर कायदे/विधीसल्लागार पदावर नेमणूक करण्याबाबत.

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव नियामक मंडळाच्या ६६ व्या बैठकीच्या मंजुर ठरावानुसार तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या कायदे विषयक विधी सल्लागार पदावर सेवानिवृत्त न्यायधीश यांची करार पध्दतीने नेमणुकीचे अर्ज मागवित आहे.

कार्यकारी संचालक ,तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांचे कार्यालयांतर्गत जळगाव,धुळे, नंदुरबार, व नाशिक या जिल्हांकरिताचे एकत्रितपणे सर्व प्रकारची न्यायालयीन कामकाजाकरीता अनुभवी सेवानिवृत्त न्यायाधीश यांची पूर्णवेळ महामंडळाच्या मुख्यालयी कायदे/विधी सल्लागार या पदी कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करावयाची आहे.

अनुभवी सेवानिवृत्त न्यायाधीश यांची नेमणूक कंत्राटी पध्दतीने अकरा महिनेसाठी करावयाची आहे. कायदे/विधी सल्लागार उमेदवार हा किमान निवृत्त जिल्हा न्यायाधीश असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज शैक्षणिक पात्रता/अनुभव व इ. पुरक कागदपत्रासह अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ जळगाव यांच्याकडे **दि. १०/०१/२०२४ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यत)** प्राप्त होईल याप्रमाणे टपालाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत.

अर्जाचे पाकीटावर **"सेवानिवृत्त अनुभवी सेवानिवृत्त न्यायाधीश यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत"** असे स्पष्ट लिहुन अर्ज सादर करावा. तसेच अर्जासोबत आपले नाव व संपुर्ण पत्ता असलेले दोन (२) रिकामे लिफाफे रुपये ३०/- इतके रकमेचे पोस्ट तिकीट चिटकवून अर्जासोबत सादर करावेत. उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा व अपुर्ण असलेल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही. सदर नेमणूका महामंडळ स्तरावरील निवड समिती मार्फत पात्र उमेदवारांच्या मुलाखतीव्दारे करण्यांत येतील. सदर नेमणूकांचे आदेश हे शासनाच्या अंतीम मान्यतेनंतरच निर्गमीत करण्यांत येतील.

**कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे**

| संवर्ग | विवक्षित कामाचा तपशिल |
|---|---|
| १ | २ |
| अनुभवी सेवानिवृत्त न्यायाधीश<br>विधी सल्लागार (०१ पद) | भूसंपादन, आस्थापना, कंत्राटविषयक व इतर विविध प्रकरणी दिवाणी / जिल्हा / औद्योगिक / कामगार / उच्च / मॅट / सर्वोच्च न्यायालयत येथे सुरु असलेल्या याचिका व उपरोक्त कामांकरीता कायदे विषयक सल्ला देण्यासाठी कायदे/विधी सल्लागार आवश्यक आहे. |

सदर नेमणूकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट **https://wrd.maharashtra.gov.in** चे मुखपृष्ठावर तसेच अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगाव या कार्यालयात उपलब्ध आहेत.

20/12/2024

**(य.का.भदाणे)**
**अधीक्षक अभियंता**
**जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ**
**जळगांव.**

## सेवानिवृत्त न्यायधिश यांच्या सदर पदावरील नेमणूका ह्या खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील.

१. अर्ज करणा-या सेवानिवृत्त न्यायाधीश यांना त्या पदाच्या कामासाठी लागणारी विशेष अर्हता व न्यायाधीश या पदावर किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. अर्ज सादर करतेवेळी इच्छुक उमेदवाराचे वय ७० वर्ष पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणुक ही अकरा महीन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने आहे. सदर नेमणूक अकरा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीकरीता वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने व उमेदवाराच्या कामाच्या अवलोकनानुसार निर्णय घेतील.

३. कायदे/विधी सल्लागार यांचे कार्यक्षेत्र हे महामंडळाच्या जळगाव,धुळे, नंदुरबार, व नाशिक या जिल्हांकरिताचे एकत्रितपणे न्यायालयीन कामकाजा करिता असेल.

४. नियुक्त उमेदवाराचा त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/ १३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट अ नुसार मासिक परिश्रमीक म्हणुन त्यांना अनुज्ञेय राहील.

५. करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागाल/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देणे बंधनकारक राहील.

६. अर्ज करणा-या सेवानिवृत्त न्यायाधीश यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक अधिका-याचे मुळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकाराक राहील.

७. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमूणक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र अटी व शर्ती संबधीत उमेदवाराला मान्य आहेत ह्याबाबतचे उमेदवाराने रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

८. अर्ज करणा-या सेवानिवृत्त न्यायाधीश विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण चालु अथवा प्रलंबीत नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

९. नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर सेवानिवृत्त न्यायाधीश त्यांच्यावर सोपविलेल्या/पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा.अशा अधिकारी यांनी Conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या सेवानिवृत्त न्यायाधीश यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिंक भत्ता अनुज्ञेय राहील.

Mahabharti.in

१२. करार पद्धतीवरील सेवानिवृत्त न्यायाधीश यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती,कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१३. नियुक्त सेवानिवृत्त न्यायाधीश यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१४.अर्ज करणा-या सेवानिवृत्त न्यायाधीश यांनी शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडून प्रमाणीत करुन तसे प्रमाणपत्र सादर करावे, तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र व विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावीत नाही असे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.

१५. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गीक अपघात व काही आजार उद्भवल्यास कोणत्याही परिस्थीतीत कार्यालय/शासन त्यास बांधील/ जबाबदार राहणार नाही.

१६.अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त न्यायाधीश यांनी त्यांचे कुटूंब निवृत्तीवेतन मंजुरीचे, महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत.

१७. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१८.मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ईमेलव्दारे/पोष्टाद्वारे व भ्रमणध्वनीवर कळविण्यांत येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तीक माहितीत त्यांचा ईमेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र व निवड झालेल्या उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ जळगाव यांचे सुचना फलकावर तसेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ईमेलव्दारे/पोष्टाद्वारे कळविण्यांत येईल.

१९.करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणा-या सेवानिवृत्त न्यायाधीश यांना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

२०. अर्जासोबत वरील अटी व शर्तीनुसार नमूद सर्व कागदपत्रांच्या मुळ / प्रमाणित छायाप्रती सादर करणे बंधनकारक राहील. कागदपत्रे अर्जासोबत प्राप्त न झाल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारण्यात येईल.

२१.उपरोक्त अटी व शर्ती व्यतीरीक्त शासन/ नियुक्ती अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील

20/12/2024

(य.का.भदाणे)
अधीक्षक अभियंता
जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ
जळगांव.

# विहित नमन्यातील अर्ज

**सेवानिवृत्त न्यायाधीश यांची तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव येथे कायदे/ विधी सल्लागार पदावर करार पद्धतीने नेमणूक करणेबाबतचा अर्ज**

**प्रति,**

**अधीक्षक अभियंता,**
**जळगाव पाटंबंधारे प्रकल्प मंडळ,**
**गिरणा भवण,आकशवाणी चौक,जळगाव.**

उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे पासपोर्ट साईज रंगीत छायाचित्र येथे चिकटवावे

**महोदय,**

मी खालील प्रमाणे माहिती संक्षिप्तपणे सादर करीत आहे.

**अर्ज केलेल्या पदाचे नाव :-----------------------------------------------**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | -श्री./श्रीमती.- |
| २ | संपर्कासाठी पत्ता | - |
| ३ | कायमचा पत्ता | - |
| ४ | दुरध्वनी क्रमांक /भ्रमणध्वनी (अनिवार्य) | - - |
| ५ | ई-मेल (अनिवार्य) | - |
| ६ | जन्मतारीख | - |
| ७ | दि.३१/१२/२०२२ रोजीचे एकुण वय | - |
| ८ | राष्ट्रीयत्व | - |
| ९ | प्रवर्ग | - |
| १० | लिंग | -पुरुष/ महिला - |
| ११ | अवगत भाषा | -हिंदी/मराठी/इंग्रजी - |
| १२ | शैक्षणिक माहिती (संक्षिप्त द्यावी) | -पदवी /पदविका/ पदवुत्तर पदवी इ. - |

१२. अनुभव -

| अ.क्र. | कामाचा हुद्या व वेतन | काम केलेल्या न्यायालयाचे नाव व पत्ता | कामाचा कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१३ :- सेवानिवृत्तीचा दिनांक —

१४:- सेवानिवृत्त ज्या कार्यालयातुन झाले त्या कार्यालयाचे नाव व पत्ता -

१५ :- सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल-

१६:- शारिरीक आरोग्य -

मला पुर्णपणे माहिती आहे की, सेवा करार पध्दतीने सेवानिवृत्त न्यायाधीश या पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद अकरा महीन्यांसाठी आहे. कामाच्या निकडीनुसार कोणत्याही जिल्हयात/तालुक्यात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझी उपरोक्त नमूद माहिती व वर दिलेला तपशिल सत्य व अचुक आहे. यामध्ये काहीही माहिती चुकीची आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्वसुचनांशिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणिव आहे.

**अर्जदाराचे नाव व दिनांकीत सही**

**ठिकाण-**

**दिनांक-**